# महाराष्ट्र शासन

sopr८.rdd-mh@nic.in
फॅक्स क्र.२२०६०४४८

क्र.सेवार्थ- २०१५/प्र.क्र.११७/पं.रा.८
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
दिनांक:- १३ जून, २०१६.
दुरध्वनी क्र. २२०७२०४१

प्रति,

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

**विषय :- मैलमजूर कामगार संदर्भात माहिती पुरविण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, मैलमजूर वेतनाकरिता स्वतंत्र उपलेखाशिर्ष घेण्याचे प्रस्तावित असल्याने खालील मुद्दयांसंदर्भात वस्तुस्थितीदर्शक अहवाल आवश्यक कागदपत्रांसह शासनास त्वरीत सादर करावा

१) रोजंदारी/ कार्यव्ययी आस्थापना, रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापना (CRTE) व रुपांतरीत नियमित स्थायी आस्थापना (CRPE) म्हणजे काय? त्यामध्ये वेतन, भत्ते, कामाचे स्वरुप यानुसार काय फरक आहे?

२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील लेखाशीर्ष ३०५४-०२२९ व ग्राम विकास विभागाकडील लेखाशीर्ष ३०५४-२४१९ मधुन उपलब्ध होणाऱ्या रकमेमधून कशाप्रकारे व कोणत्या मजूरांचे वेतन अदा केले जाते?

३) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत कार्यरत असणाऱ्या मैल मजूरांची संख्येत असमानता आढळून येते. त्याअनुषंगाने जि.प. च्या मैलमजूरांची संख्या कोणत्या निकषांच्या आधारे निश्चित केली जाते?

४) मैलमजूर हे रोजंदारीवरील कर्मचारी आहेत किंवा त्यांना निश्चित वेतनश्रेणी प्रमाणे दरमहा वेतन मिळते?

उपरोक्त मुद्यांच्या खुलाशासह आपल्या जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत **मैलमजूर कामगार संदर्भातील पुढील माहिती तक्त्यात बिनचूक भरुन त्याची सॉफ्ट कॉपी** शासनास विनाविलंब sopr८.rdd-mh@nic.in या ई-मेल पाठवावी, ही विनंती.

| मैल मजूराचे नांव | जन्म तारीख | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | सेवा निवृत्ती दिनांक | वेतन श्रेणी | सद्यस्थितीत दरमहा मिळणारे वेतन | मार्च, २०१५ ते फेब्रु. २०१६ अखेर अदा केलेले वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

आपली
[signature]

(रेखा काळसेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत : कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सर्व यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.